श्री व्यंकटेश महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची आय. आय. एम. त्रिची येथे निवड

"मागील अनेक वर्षापासून श्री व्यंकटेश महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अनेक ठिकाणी यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाचे नाव उंच शिखरावर पोहोचले आहे. विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश प्राप्त केल्यानंतर महाविद्यालयास त्याचा अभिमान वाटतो. महाविद्यालयातून असेच गुणवंत विद्यार्थी घडविण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील असतो." असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी केले. ते महाविद्यालयातील हर्षवर्धन पाध्ये या विद्यार्थ्यांची आय.आय.एम. त्रिची येथे निवड झाल्याबद्दल त्याच्या सत्कार कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. महाविद्यालयाचा हर्षवर्धन वीरेंद्र पाध्ये या विद्यार्थ्यांने महाविद्यालयांमध्ये बी.कॉम. चे शिक्षण पूर्ण केल्यानंतर आय. आय. एम. प्रवेश परीक्षेची तयारी केली. महाविद्यालयातील शिक्षणाबरोबरच त्याने टी. आय. एम. इ. कोल्हापूर मधून कॅट परीक्षेचे क्लासेस पूर्ण केले. त्यानंतर त्याने कॅट परीक्षा दिली. यामध्ये त्याचे 11 आय. आय. एम. मध्ये सिलेक्शन झाले. यामधून त्याने नामांकित आय.आय.एम. त्रिची याची निवड केली. त्याला कॅट एक्झाम मध्ये 96.86 पर्सेंटाइल प्राप्त झाली. याबद्दल महाविद्यालयाने त्याच्या सत्काराचे आयोजन केले होते. विद्यार्थ्याचे पालक व विद्यार्थी यांना पुष्पगुच्छ देऊन त्याचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

